विक्रीकर आयुक्त महाराष्ट्र राज्य
मुंबई यांचे कार्यालय, ८ वा मजला,
नवीन इमारत, विक्रीकर भवन,
माझगांव, मुंबई - ४०० ०१०.

संदर्भ: - १. कार्यालयीन आदेश क्र.-विविआ/२०१५/आस्था-३/पुनर्रचना कक्ष/फेररचना/अपिले कार्यभार/प्र.क्र.७६, दि. १७/१२/२०१५.
२. कार्यालयीन आदेश क्र. विविआ/२०१५/आस्था-३/पुनर्रचना कक्ष/फेररचना/अपिले कार्यभार/प्र.क्र.७६ दि. २८/११/२०१६
३. शुध्दीपत्रक क्र.-विविआ/२०१५/आस्था-३/पुनर्रचना कक्ष/फेररचना/अपिले कार्यभार/प्र.क्र.७६ दि. ३०/११/२०१६.
४. कार्यालयीन आदेश क्र. विविआ/२०१५/आस्था-३/पुनर्रचना कक्ष/फेररचना/अपिले कार्यभार/प्र.क्र.७६ दि. २१/१२/२०१६.
५. कार्यालयीन आदेश क्र.-विविआ/२०१५/आस्था-३/पुनर्रचना कक्ष/फेररचना/अपिले कार्यभार/प्र.क्र.७६, दि.०५/०१/२०१७.

## कार्यालयीन आदेश

क्र.-विविआ/२०१५/आस्था-३/पुनर्रचना कक्ष/फेररचना/अपिले कार्यभार/प्र.क्र.७६, मुंबई दि. 28 FEB 2017

उपरोक्त संदर्भ क्र. १ मधिल आदेशान्वये बदललेल्या अपिल कार्यपध्दतीच्या संबंधात निर्देश देण्यात आले होते. त्या बाबत संदर्भ क्र. ३ अन्वये, निर्धारणा / वैधानिक आदेशाविरुध्द अपिल दाखल करते वेळी व्यापाऱ्याचे प्रकरण ज्या अधिकाऱ्याकडे नेमून दिले आहे त्याच्या नियंत्रक विक्रीकर उपआयुक्त / विक्रीकर सहआयुक्त यांच्या कडे अंशत: भरणा नक्की करण्यासाठी अपिल दाखल करण्यात यावे अशा सुचना देण्यात आल्या आहेत. या संदर्भात विविध कार्यालयांकडून प्राप्त झालेल्या पत्रांच्या अनुषंगाने खालील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

**अ**. सहायक विक्रीकर आयुक्त / विक्रीकर अधिकारी यांनी पारीत केलेल्या निर्धारणा / वैधानिक आदेशा विरुध्द अपिल विक्रीकर उपआयुक्तांकडे दाखल करावयाचे आहे. परंतू जर सहायक विक्रीकर आयुक्त / विक्रीकर अधिकारी यांनी निर्धारणा / वैधानिक आदेश पारित केलेला व्यापारी (TIN), फेररचनेनंतर (Restructuring) विक्रीकर उपआयुक्त यांच्याकडे नेमून देण्यात आला असेल तर अशा प्रकरणात ज्या विक्रीकर उपआयुक्त यांच्याकडे तो व्यापारी नेमून देण्यात आला आहे, त्या विक्रीकर उपआयुक्तांऐवजी त्याच नोडल विभागातील दुसऱ्या विक्रीकर उपआयुक्तांकडे सदर प्रकरणातील अपिल दाखल करुन घेण्याबाबत संबंधित विक्रीकर सहआयुक्त यांनी आदेश द्यावेत.

**ब**. विक्रीकर उपआयुक्त यांनी पारीत केलेल्या निर्धारणा / वैधानिक आदेशा विरुध्द नियंत्रक विक्रीकर सहआयुक्तांकडे अपिल दाखल करावयाचे आहे. परंतू जर विक्रीकर उपआयुक्त यांनी निर्धारणा / वैधानिक आदेश पारित केलेला व्यापारी (TIN) फेररचनेनंतर (Restructuring) सहायक विक्रीकर आयुक्त / विक्रीकर अधिकारी यांच्याकडे नेमून देण्यात आला असेल तर अशा प्रकरणातील अपिल संबंधीत नियंत्रक विक्रीकर सहआयुक्त यांचेकडे दाखल करुन घेण्यात यावे.

**क**. विक्रीकर उपआयुक्त यांनी पारीत केलेल्या निर्धारणा / वैधानिक आदेशा विरुध्द संबंधीत नियंत्रक विक्रीकर सहआयुक्तांकडे अपिल दाखल करावयाचे आहे. मात्र ज्या नोडल विभागातील विक्रीकर सहआयुक्त या पदाचा कार्यभार विक्रीकर उपआयुक्त यांच्याकडे सोपवलेला असेल अशा नोडल विभागातील विक्रीकर उपआयुक्त यांनी पारीत केलेल्या निर्धारणा / वैधानिक आदेशा विरुध्दचे अपिल संदर्भ क्र. १ मधिल कार्यालयीन आदेश दि. १७/१२/२०१५ अन्वये त्या नोडल विभागासाठी घोषीत केलेल्या संबंधीत विक्रीकर सहआयुक्त (अपिले) यांच्याकडे दाखल करण्यात यावे.

बदललेल्या अपिल कार्यपध्दतीनुसार अनुक्रमांक अ व ब मधिल अपिल प्रकरणात, व्यापाऱ्यास सुनावणीची संधी देवून अंशत: भरणा रक्कम निश्चित करणे व त्या रकमेचा व्यापाऱ्याने भरणा केल्यानंतर स्थगिती आदेश जारी करण्यापर्यंतची कार्यवाही विक्रीकर सहआयुक्त / विक्रीकर उपआयुक्त यांनी करावयाची आहे. स्थगिती आदेश जारी केल्यानंतर दि.२८/११/२०१६ च्या आदेशातील परिच्छेद क्र. ३ मध्ये विषद केलेल्या अपिल कार्यवाही स्थानांतरण कार्यपध्दती नुसार कार्यवाही करुन ती अपिले संदर्भ क्र.१ दि. १७/१२/५२०१५ च्या आदेशात नमुद केलेल्या विक्रीकर सहआयुक्त (अपिले) / विक्रीकर उपआयुक्त (अपिले) यांच्याकडे स्थानांतरीत करण्यात यावीत.

**विक्रीकर आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

प्रत :-

१. विशेष विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. अपर पोलीस महासंचालक व मुख्य दक्षता अधिकारी, महाराष्ट्र राज्य मुंबई.
३. अप्पर विक्रीकर आयुक्त, मुंबई- १, २, ३, ४/ठाणे/नाशिक/कोल्हापुर/नागपुर/ठाणे.
४. सर्व विक्रीकर सहआयुक्त.
५. आयुक्तांच्या कार्यालयातील सर्व कार्यासने.
६. सर्व विक्रीकर उपायुक्त, सहायक विक्रीकर आयुक्त आणि विक्रीकर अधिकारी.
७. सर्व आस्थापना अधिकारी.
८. निवडनस्ती.
९. स्थळप्रत.